# Namdev Haripath Marathi अभंग

- १ -

नामाचा महिमा कोण करी सीमा । जपावे श्रीरामा एका भावे ॥

न लागती स्तोत्रे नाना मंत्र यंत्रे । वर्णिजे बा वक्त्रे श्रीरामनामा ॥

अनंत पुण्यराशी घडे ज्या प्राण्यासी । तरी मुखासी नाम घेत ॥

नामा म्हणे नाम हा जप परम । तो देह उत्तम मृत्युलोकी ॥

- २ -

जन्माचे कारण राम नाम पाठी । जाईजे वैकुंठी एक वेळा ॥

रामराम ऐसा जिव्हे उमटे ठसा । तो उद्धरेल आपैसा इहलोकी ॥

दो अक्षरी राम जप हा परम । न लगे तुज नेम पंथ ॥

नामा म्हणे पवित्र श्रीराम चरित्र । उद्धरीते गोत्र पूर्वजेसी ॥

- ३ -

विषयांचे गोड का करिशील कोड । होईल तुज इंद्रिय बाधा ॥

सर्वही लटिके जाण तूं हे निके । रामेवीण एक न सुटिजे ॥

माय जाळ मोहो इंद्रियाचा रोहो । परि न धरेचि भावो भजन पंथे ॥

नामा म्हणे देवा करी तूं लवलाहे । मयूराचा टाहो घन गर्जना ॥

- ४ -

कासवीचे दृष्टि जै येईजे भेटी । तै अमृताची सृष्टि घडे त्यासी ॥

तैसे हे भजन श्रीरामाचे ध्यान । वाचे नारायण अमृतमय ॥

धन्य त्याचे कुळ सदा पै सुफळ । दिन दिनी पळ रामनाम ॥

*नामा म्हणे चोखट भक्त तो उत्तम । वाचेसी सुगम रामनाम ॥*

*- ५ -*

*सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ । वंदि कळिकाळ शास्त्र सांगे ॥*

*ब्रह्मांडनायका ऐसे जे कौतुक । तेचि नाम एक श्रीकृष्ण ऐसे ॥*

*आदि अंत पाहतां नाही पै सर्वथा । परिपूर्ण सरिता अमृताची ॥*

*नामा म्हणे अनंत कां करिशी संकेत । उद्धरिले पतित युगायुगी ॥*

*- ६ -*

*श्रीगोविंद गोपाळ ऐसी वाचा निखळ । तो उबरे तात्काळ कडिमाजी ॥*

*नारायण नारायण हेचि पारायण । उद्धरले जन इहलोकी ॥*

*तुटती यातना कर्माची भावना । जडजीव उद्धरणा रामनाम ॥*

*नामा म्हणे राम हा जप परम । न लागती नेम नाना कोटी ॥*

*- ७ -*

*तीर्थ जप राशी जप हृषीकेशी । मुखी अहर्निशी रामनाम ॥*

*तीर्थाचे पै तीर्थ नाम हे समर्थ । होईल कृतार्थ रामनामे ॥*

*साधेल साधन तुटेल बंधन । वाचे जनार्दन सुफल सदा ॥*

*नामा म्हणे हरी तू उच्चार करी । उद्धरसी निर्धारी इहलोकी ॥*

*-८-*

*पाहता इथे परिपाठी आणिक नाही सृष्टी । नामेवीण दृष्टि न दिसे माझ्या ॥*

*नामचि समर्थ नामचि मथित । शंकरासी हेत रामनामी ॥*

*पूरती सर्व काम वाचे रामनाम । न लगती ते नेम कर्मजाळ ॥*

*नामा म्हणे उच्चार न करी तूं विचार । तुटेल येरझारा नाना योनी ॥*

*- ९ -*

*तपाचे हे तप राम हे अमूप । करि का रे जप राम नामी ॥*

*रामकृष्ण म्हणे वाचे नारायण । तुटेल बंधन यमपाश ॥*

*साधेल साधन होती कोटी यज्ञ । नाम जनार्दन जप करी ॥*

*नामा म्हणे जिव्हारी नामस्मरण करी । जपे नरहरि एक्या भावे ॥*

*- १० -*

*हाचि नेम सारी साधेल तो हरी । नाम हे मुरारी अच्युताचे ॥*

*राम गोविंद हरे कृष्ण गोविंद हरे । यादव मुरारे रामनामे ॥*

*न अगती कथा नाना विकळता । नामचि स्मरतां राम वाचे ॥*

*नामा म्हणे राम आम्हां हाचि नेम । नित्य तो सप्रेम जप आम्हां ॥*

*- ११ -*

*करी हे किर्तन राम नारायण । जनी जनार्दन हेचि खरे ॥*

*जगाचा जनक रामकृष्ण एक । करिता विवेक स्मर राम ॥*

*तुटेल भवजाळ का करिसी पाल्हाळ । सर्व मायाजाळ इंद्रिय बाधा ॥*

*नामा म्हणे गोविंद स्मर तू सावध । नव्हे तुज बाध नाना विघ्ने ॥*

*- १२ -*

*मायेची भूचरे रज तम सात्त्विक । रामनाम एक सोडवण ॥*

*राम हेचि स्नान राम हेचि ध्यान । राम घडे यज्ञ कोटि देखा ॥*

*न लागति साधने नानामंत्र विवेक । रामनामी मुख रंगवि कारे ॥*

नामा म्हणे श्रीराम हेचि वचन आम्हा । नित्य ते पौर्णिमा सोळा कळी ॥

- १३ -

मी माझे करिता गेले हे दिवस । न घरीच विश्वास रामनामी ॥

अंती तुज उद्धरती रामकृष्ण हरी । राम पंचाक्षरी मंत्र सार ॥

का करिसी सांठा प्रपंच विस्तार । न तुटे येरझारा नामेवीण ॥

नामा म्हणे ऐसे रामनामी पिसे । तो उद्धरेल आपैसे इहलोकी ॥

- १४ -

नको नको माया सांडो लवलाह्या । पुढील उपाया झोंबे कारे ॥

रामनाम म्हणे तुटेल बंधन । भवबंध मोचन ऐक्या नामे ॥

स्मरता पतित उद्धरेल यथार्थ । नाम हाचि स्वार्थ तया झाला ॥

नामा म्हणे हा जप करी तूं अमूप । रामे चुके खेप इये जनी ॥

- १५ -

स्मरण करिता रामनाम ध्वनी । ऐकतांची कर्णी पळे यम ॥

नामपाठ करी रामकृष्ण हरी । होतील कामारी ऋद्धिसिद्धि ॥

साध्य तेचि साधी न करि उपाधी । जन्मांतरीच्या व्याधी हरती नामे ॥

नामा म्हणे सर्व राम याचि भाव । नाही अनेक देवो रामेवीण ॥

- १६ -

रामकृष्ण माळा घालितां अढळ । तुटेल भवजाळ मायामोह ॥

होशील तू साधू न पावसी बाधू । पूर्णा ब्रह्मानंद तुष्टेल तुज ॥

नामा म्हणे कृतार्थ सर्व मनोरथ । न लगती ते अर्थ मायापाश ॥

- १७ -

शरीरसंपत्ति मायेचे टवाळ । वायाचि पान्हाळ मिरवितोसी ॥

नाम हेचि तारी केशव निर्धारी । म्हणे हरि हरि एक वेळा ॥

स्मरतां गोपाळ राम वंदीतील । यमा न लागती नेम मंत्र बाधा ॥

नामा म्हणे सार मंत्र उत्तम । राम हेचि नाम स्मरे कारे ॥

- १८ -

कृष्ण कथा सांग जेणें तुटे पांग । न लागे दुजे उद्योग करणें काही ॥

समर्थ सोयरा राम हा निधान । जनी जनार्दन एक ध्याई ॥

नाम हेचि सार राम हेचि सार । तराल निर्धार श्रुति सांगे ॥

नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सार । तुटेल येरझारा भवाब्धीची ॥

- १९ -

भवाब्धी तारक रामकृष्ण नाव । रोहिणीची भाव सरळ दिसे ॥

नाम हेचि थोर नाम हेचि थोर । वैकुंठी विहार रामनामे ॥

राम हे निशाणी जपतांची अढळ । वैकुंठ तात्काळ तया जीवा ॥

नामा म्हणे वैकुंठ नामेचि जोडेल । अंती तुज पावेल राम एक ॥

- २० -

जळाचा जलबिंदु जळीच पै विरे । तैसे हे बिघडे पांचाठायी ॥

जीव शिव विचार राम मधुर । जिव्हेशी उपचार रामराम ॥

रामनाम तारक शिव षडाक्षरी । तैशी वाचा करी अरे मूढा ॥

नामा म्हणे ध्यान शिवाचे उत्तम । मंत्र हा परम रामनाम ॥

- २१ -

*करिता हरिकथा राम सुखराशी । उद्धार जिवाशी एका नामे ॥*

*ते हे रामनाम जपे तू सप्रेम । जप हा सुगम सुफळ सदा ॥*

*नामेचि तरले नामेचि पावले । नाम म्हणता गेले वैकुंठासी ॥*

*नामा म्हणे एक रामेसी विनटे । ते वैकुंठीचे पेठे पावले देखा ॥*

- २२ -

*नामावाचून काही दुजे येथे नाही । वेगी लवलाही राम जपा ॥*

*गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ । पावसी केवळ निजपद ॥*

*ध्रुव प्रल्हाद बळि अंबऋषि । प्रसिद्ध नामेचि चित्पद पावले देखा ॥*

*नामा म्हणे राम वाचे जपा नाम । संसार भव भ्रम हरे नामे ॥*

- २३ -

*म्हणता वाचे नाम वंदी तया यम । कालादिक सम वंदी तया ॥*

*ऐसे नाम श्रेष्ठ सकळांहुनि वरिष्ठ । उच्चारित नीट वैकुंठ गाजे ॥*

*तो हा नाममहिमा वाखाणित ब्रह्मा । न कळे तया उपमा आदि अंती ॥*

*नामा म्हणे पाठे नामाचेनि वाटे । तरी प्रत्यक्ष भेटे विठ्ठल हरी ॥*

- २४ -

*विष्णुनाम श्रेष्ठ गाति देव ऋषि । नाम अहर्निशी गोपाळाचे ॥*

*हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरी । असे चराचरी जनार्दन ॥*

*आदि ब्रह्म हरि आळवी त्रिपुरारी । उमेप्रति करी उपदेश ॥*

*नामा म्हणे पूर्णब्रह्म जप उत्तमोत्तम । शंकराशी नेम दिननिशी ॥*

- २५ -

का करतोसि शिण वाचेसी नारायण । जपता समाधान होईल तुज ॥

कृष्ण गोविंद हरे गोविंद । वाचेसी हा छंद नामपाठ ॥

वंदितील यम कळिकाळ सर्वदा । न पावसी आपदा असता देही ॥

नामा म्हणे ओळंदे शिण झाला सांगे । प्रपंच आउगे सांडी परते ॥

- २६ -

नामाचेनि पाठ जातील वैकुंठे । तो पुंडलिक पेठे प्रगट असे ॥

विठ्ठल हा मंत्र सांगतसे शास्त्री । आणिक नाही शास्त्र नामाविण ॥

पुराण व्युत्पत्ति न लागती श्रुती । हरिपंथी मुनी गेले गेले ॥

नामा म्हणे हरि नामेचि उद्धरी । जन्माची येरझारी हरी नामे ॥

- २७ -

सर्वभूती भज नमन करी संता । नित्य हा अच्युता स्मरण करी ॥

ऐसे भजन विनट सापडे वाट । रामकृष्ण नीट वैकुंठचि ॥

न लागती साधन मायेचे बंधन । एक्या नामे होणे चतुर्भुज ॥

नामा म्हणे थोर नामाचि आधार । वैकुंठी बिढाड तया भक्ता ॥

- २८ -

तूं तव नेणता परी हरि तो जाणता । आतां हेचि समता सर्वांभूति ॥

सर्व ब्रह्म हरि एकचि निर्धारी । होशी झडकरी ब्रह्म तूंचि ॥

अच्युत माधव अमृताच्या पोटी लागताचि पाठी बंदी यम ॥

नामा म्हणे होशी जिवलग विष्णूचा । दास त्या हरिचा जिवलग ॥

- २९ -

कां करिसी सोस मायेचा आसोसु । नव्हे तुज सोरसु नामेवीण ॥

नामाचाच मंत्र नामाचेचि तंत्र । नामाविण पवित्र नव्हेसि देखा ॥

तिही लोकी पाहता नामाविण सर्वथा । अच्युता म्हणता पुण्यकोटी ॥

नामा म्हणे तेचि ब्रह्म आदि अंति नेम । ते विटेवरी सम उभे असे ॥

- ३० -

पवित्र परिकर नाम हा उच्चार । उद्धारण साचार जगा येत्या ॥

गोविंद केशव उच्चार श्रीराम । न लगती नेम अमूप जप ॥

ते हे विठ्ठलरूप पाहिले पंढरी । नाम चराचरी विठ्ठल ऐसे ॥

नामा म्हणे विठ्ठल सर्वात सखोल । उच्चारिता मोल न लगे तुज ॥

- ३१ -

पोशिशी शरीर इंद्रियांची बाधा । शेखि ते आपदा करिल तुज ॥

नव्हे तुझें हित विषय पोषिता । हरिहर म्हणता उद्धरसी ॥

वायाचि पाल्हाळ चरित्र सांगसी । पार नाम न म्हणसी अरे मूढा ॥

नामा म्हणे पूर्ण पंढरी निधान । उच्चारिता जन तरेल ऐसे ॥

- ३२ -

विषय खटपट आचार सांगसी । विठ्ठल न म्हणसी अरे मूढा ॥

पूर्ण ब्रह्म हरि विठ्ठल श्रीहरी । अंती ही निर्धारी तारील सत्य ॥

नलगे सायास करणे उपवास । रामाचा विश्वास ऐसा धरी ॥

नामा म्हणे प्रेम घरी तू सप्रेम । विठ्ठल हाचि नेम दिननिशी ॥

- ३३ -

नव्हे तुझे हित विषय पोषितां । हरि हरि म्हणता तरशील ॥

माधव श्रीहरी कृष्ण नृसिंह हरि । वेगी हा उच्चारी लवलाही ॥

घडतील यज्ञ होतील ते भग्न । प्रपंची सर्वत्र होईल ब्रह्म ॥

नामा म्हणे करी कथा हरि भय व्यथा । उद्धार सर्वथा भाक माझी ॥

- ३४ -

उपदेश सुगम ऐकेरे एक । नामा हे सम्यक विठोबाचे ॥

जनी जनार्दन भावचि संपन्न । विठ्ठल उद्धरण कलिमाजि ॥

निधान पुरेल मनोरथ । नामेचि कृतार्थ होती जन ॥

नामा म्हणे नामे घे तू झडकरी । पावसी निर्धारी वैकुंठपद ॥

: नामदेवकृत हरिपाठ समाप्त :-